## -:जाहिरात मसुदा:-

विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र नागपूर का यांचे कार्यालय

निरूपयोगी द्रवनत्र पात्र खरेदी करणाऱ्या खरेदीदार संस्थाकंपन्या यांना /व्यापारी/ सुचित करण्यात येते कि शासकिय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्रनागपूर येथील खालील , प्रमाणे निर्लेखित केलेले निरूपयोगी द्रवनत्र पात्रे ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत. लिलावाच्या अटी व शर्ती खात्याच्या संकेत स्थळावर )dahd.maharashtra.gov.in व या कार्यालयात कार्यालयीन ( .वेळेत उपलब्ध आहेत

खालील प्रमाणे निर्लेखित केलेले निरूपयोगी द्रवनत्र पात्रे लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत-

| अ.क्र | द्रवनत्र पात्राचा क्रमांक | द्रवनत्र पात्राची संख या |
|---|---|---|
| 1 | IN- 50 | 19 |
| 2 | TA-55 | 42 |
| 3 | Model AL | 2 |
| 4 | OM 320 | 2 |
| 5 | HLP-500 (CRYOVESCEL | 1 |
| 6 | BA- 42 | 5 |
| 7 | BA-20 | 2 |
| 8 | BA - 1.5 | 1 |
| 9 | BA.-3 | 1 |
| 10 | IR -3 | 2 |
| 11 | LAB- 50 | 6 |
| 12 | J-12 | 4 |
| | TOTAL | 87 |

त्या करीता दिनांक ०३/०५/२०२५ शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता शासकिय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र, नागपूर या ठिकाणी जाहिर लिलाव आयोजीत करण्यात येत आहे. तरी इच्छुक सर्व व्यापारी, खरेदी संस्था, कंपन्या यांना या जाहिर लिलावात भाग घेण्यासाठी रूपये १०,०००/- (दहा हजार फक्त) चा राष्ट्रीय कृत बँकेचा धनाकर्ष विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्रनागपूर, यांचे नावे काढलेला किंवा रोख रक्कम कार्यालयास भरणे आवश्यक आहे. लिलाव प्रक्रिये दरम्याण लिलाव प्रक्रिये बाबतचा अंतिम निर्णय विभागीय व्यवस्थापक,शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र.नागपूर, यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या निर्लेखन समितीचा राहिल. तसेच लिलाव प्रक्रिये नंतर हस्तांतरीत करण्यात येणारे द्रवनत्र पात्रे चेपून टाकण्यात येतील त्यांचा पुर्नवापर करणे शक्य होणार नाही.

विभागीय व्यवस्थापक,
शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र,नागपूर.

# अटी व शर्ती

१. लिलावामध्ये भाग घेणाऱ्यास अनामत रक्कम रु. १०,०००/- धनाकर्षाद्वारे किंवा रोखीने भरावी लागेल.

२. सदरची रक्कम लिलाव घेणाऱ्या व्यतीरीक्त अयशस्वी लिलाव धारकास लिलाव पुर्ण होताच परत करण्यात येईल.

३. एखाद्या व्यक्तिस दुसऱ्याच्या वतीने अथवा कंपनी तर्फे बोली बोलायची असेल तर बोली बोलणाऱ्या व्यक्तीने ठराविक नमुन्यात अधिकार पत्र, पॉवर ऑफ ॲटर्नि दाखल करावी लागेल, तरच बोली बोलता येईल. भागीदारी असेल तर भागीदारी पत्राची साक्षांकित प्रत दाखल करावी लागेल तरच त्यांना बोली बोलता येईल.

४. लिलाव खरेदी दाराने विक्री किंमतीचा भरणा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट **विभागीय व्यवस्थापक, शासकिय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र, नागपूर यांचे नावाने** रोखीकृत होईल अशा तऱ्हेने काढावा.

५. लिलावात सहभागी होणाऱ्याने स्वत:ची ओळख त्याचा पत्ता या पुष्टयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील. उदा. पॅनकार्ड, आधारकार्ड,निविडणुक ओळखपत्र, विजबिल इ.

६. लिलावात अंतर्भुत द्रवनत्र पात्राची पाहणी मोक्यावर अगोदरच करुन स्वत:ची खात्री करुन घ्यावी. लिलावानंतर बोली धारकास याबाबत कोणताही उजर/अधिकार नाही.

७. लिलावाची बोली सुरु असतांना तिसऱ्या किंवा अंतीम बोलीवर कोणत्याही कारणास्तव लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीने राखुन ठेवला आहे.

८. लिलावाची बोली रु. १,०००/- च्या पटीतच बोलावी लागेल.

९. लिलावात सर्वात जास्त किंमतीचे बोली समितीस मान्य असल्यास तिनदा बोलुन सदरची बोली निश्चित करण्यात येईल.

१०. लिलाव मंजुर झाल्यानंतर सदर द्रवनत्र पात्रांची राखण करण्याची जबाबदारी

नैसर्गिक आपत्ती वा इतर कारणामुळे लिलाव झालेल्या द्रवात्र पात्रांचे नूकसान झाल्यास विकत घेणारे/लिलाव घेणारे जबाबदार राहतील व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. यशस्वी बोलीधारकाने लावण्यात आलेल्या बोलीच्या रकमेपैकी संपुर्ण रक्कम त्याच दिवशी कार्यालयात जमा करावी लागेल.

१३. लिलावास अंतीम मंजुरी देणे अथवा लिलाव नाकारणे, लिलाव स्थगित करण्याचा किंवा लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल तो सर्व बोली धारकास बंधाकारक असेल.

१४. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास या बाबतचा अंतीम निणिर्य हा लिलाव समितीचा असेल, व सर्व बोलीधारकास तो बंधनकारक राहील.

१५. अंतीम लिलाव ज्याचे मंजुर होईल त्याने लिलावातील संपुर्ण वस्तुची वाहतुक स्वतःच्या वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल मदतनीस मिळणार नाही व तसेच लिलाव अंतीम झालेल्या वेळेपासुन मालाची प्रत्यक्ष वाहतुक करेपर्यंत लिलावाच्या वस्तुचे संरक्षण बोलीधारकाने स्वत: करायचे आहे. या कालावधीत लिलावातील कोणतीही वस्तु गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.

१६. वरील अटी व शर्ती मंजुर असणाऱ्या खरेदी दारालाच भाग घेता येईल.

**विभागीय व्यवस्थापक**
**शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र नागपूर**